**दिनांक 30.11.2023 मा. विभागीय आयुक्त, कोकण यांचे अध्यक्षतेखाली कोकण पाणथळ तक्रार निवारण समितीच्या 45 व्या बैठकीची विषयसूची. (वेळ 04.00 वाजता)**

| अ.क्र | विषय |
|---|---|
| 1 | महानगरपालिके अंतर्गत पाणथळ तक्रार निवारण समिती गठीत करणेबाबत व समितीच्या दरमहा बैठका घेणेबाबत. |
| 2 | नोडल अधिकाऱ्यांच्या उपस्थितीबाबत चर्चा. |
| 3 | पाणथळ तक्रार निवारण समितीसाठी टोल फ्री क्रमांक सुरु करणेबाबत चर्चा. |
| 4 | डेब्रिस हटवून इतरत्र निश्चित ठिकाणी टाकण्याबाबत चर्चा. |
| 5 | पाणथळ तक्रार निवारण समितीच्या कार्याबाबत चर्चा. |

## कोकण पाणथळ तक्रार निवारण समितीकडे प्राप्त तक्रारींवरील कार्यवाहीचा तपशील

| अ.क्र | तक्रार क्र. व तक्रारीचा विषय | करावयाची कार्यवाही | कार्यवाही करणारी यंत्रणा |
|---|---|---|---|
| | | **मुंबई उपनगर जिल्हयातील कांदळवन तक्रारी** | |
| 1 | **श्री. स्टॅलीन डी.**<br>**(WC- 73)**<br>Destruction of wetlands & near Bhakti Park Mono Rail station & nearby areas in Wadala.<br>दि. 31.01.2019 | • **मा.अध्यक्ष यांनी उपायुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना सदर जागेवरील डेब्रिज हटविण्याची कार्यवाही पूर्ण करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल पुढील बैठकीपूर्वी समितीस सादर करण्याचे निर्देश दिले होते.**<br>• त्याअनुषंगाने उप आयुक्त, मीठागरे विभाग, मुंबई यांच्या कार्यालयाचा दि.10.10.2023 रोजीचा प्राप्त अहवालात असे नमूद केले आहे की, SCO ने हॉर्मोज सॉल्ट वर्क्सच्या मीठ उत्पादकांवर आवश्यक कारवाई केली आहे. सॉल्ट उत्पादकांनी होर्मोझ सॉल्ट वर्क्स मधून C&D कचरा काढून टाकण्यास दि.14.06.2023 पासून सुरुवात केली असून आमचे अधिकारी व वॉच अँड वॉर्डचे कर्मचारी सॉल्ट पॅन विभागाच्या CS क्रमांक 145 मधून C&D कचरा काढण्याच्या कामावर नियमितपणे देखरेख ठेवत आहेत. कार्यालयातील नोंदीनुसार, दिनांक 21.06.2023 पर्यंत, सॉल्ट पॅन विभागाच्या CS क्रमांक 145 मधून मीठ उत्पादकांनी C&D कचऱ्याचे 20 डंपर काढले. CS No. 145 मधून मीठ उत्पादकांद्वारे C&D कचरा काढून टाकण्याच्या अत्यंत संथ गतीने चालू असलेली प्रक्रिया उक्त मीठ उत्पादकांना वारंवार सूचना देऊन साईट वरुन C&D कचरा जलद गतीने काढण्याबाबत सांगितले होते परंतु मीठ उत्पादक त्यात अयशस्वी झाले. मीठ उपअधीक्षक, वडाळा यांनी दि. 22.06.2023 रोजी मीठ उत्पादक यांचे विरुध्द वडाळा पोलिस स्टेशन येथे तक्रार नोंद केली आहे आणि त्यानंतर FIR No. 144 of 2023 दाखल करण्यात आला आहे.<br>• मीठ उपअधीक्षक, वडाळा यांच्या सध्याच्या अहवालानूसार दि.22.06.2023 पासून मेसर्स होर्मोज सॉल्ट वर्क्सच्या बंधाऱ्यांमधून C&D कचरा उचलणे, वाहतूक करणे आणि त्यावर प्रक्रिया करण्यात आलेली नाही. जून 2023 च्या शेवटच्या आठवडयात, मीठ उत्पादकांनी C&D कचऱ्याच्या पुढील प्रक्रियेसाठी परवानगी मिळविण्यासाठी NMMC, वाशी येथे संपर्क साधला असता, त्यास परवानगी मिळाली परंतु, तो पर्यंत पावसाळा सुरु झाला आणि संततधार पाऊसामुळे उचल आणि वाहतूक प्रक्रिया ठप्प झाली. पावसाळयात माती चिखल होऊन जड वाहने अडकण्याचा धोका असतो. पावसाळा संपल्यानंतरच उचल आणि वाहतूक प्रक्रिया पुन्हा सुरु करता येईल. तुर्भे प्लांट मधील C&D कचऱ्याच्या पुढील पुर्नप्रक्रियेसाठी परवानगी मिळविण्यासाठी मीठ उत्पादकांना पुन्हा NMMC कडे संपर्क साधण्यास सांगण्यात आले आहे. परंतु परवानगी अद्याप प्रलंबित असल्याचे नमूद केले आहे. | 1. उपनमक आयुक्त कार्यालय, मुंबई<br>2. बृहन्मुंबई महानगरपालिका |

<table>
<tr>
<td>2</td>
<td>श्री.स्टॅलिन डी.<br>(WC-109)<br>Request for restoration of Culvem lake Gorai and also action against destroyers of wetlands.<br>दि. 15.04.2023</td>
<td rowspan="2">• सदर तक्रारी संदर्भात निवासी उपजिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी पर्यावरण विभागाशी समन्वय साधून उप विभागीय अधिकारी, मुंबई उपनगर यांचे सोबत दोन्ही तक्रारी संदर्भात संयुक्त स्थळपाहणी झाली असल्याचे समितीस चर्चे दरम्यान सांगिण्यात आले होते.<br>• त्याअनुषंगाने मा.अध्यक्ष यांनी निवासी उपजिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांना स्थळपाहणी अहवाल समितीस सादर करण्याचे निर्देश होते.<br>• त्यानुषंगाने, जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचा कार्यालयाचा दि. 18.10.2023 रोजीच्या प्राप्त अहवालात नमूद केले आहे की, मौजे मनोरी, ता.बोरीवली येथील न.भू.क्र. 185 या शासकीय मिळकतीवर दि. 30.05.2023 रोजी वनरक्षक, मालवणी व वनरक्षक, मनोरी यांच्या संयुक्त स्थळपहाणीत तक्रारीत नमूद क्षेत्र हे अधिसुचित राखीव कांदळवन क्षेत्राचा भाग नसून सदरचे क्षेत्र 50 मी. च्या बाहेर येत आहे. तसेच, MRSAC नकाशानुसार सन 2005 साली सदर ठिकाणी कांदळवन नाही व सद्यस्थितीत देखील कांदळवन नाही.<br>• तसेच, तक्रारीत नमूद तलावाचे सुशोभीकरण करतांना माती काढण्यात आली असून सदरची माती तलावाच्या क्षेत्रामध्येच ठेवण्यात आलेली आहे. याबाबत, महाराष्ट्र शासनाचे महाराष्ट्र गौणखनिज उत्खनन (विकास व विधिनियम) नियम, 2013 चे मुख्य नियमांचे नियम 46 मध्ये सुधारणा करुन दि. 11 मे, 2015 रोजीच्या सुधारीत अधिसुचनेनुसार उपरोक्त गौणखनिज उत्खनन नियमात बदल करुन ज्यावेळी एखाद्या जमिनीचा, एखाद्या भूखंडाचा विकास करतांना मातीचे उत्खनन करुन ती माती त्याच भूखंडाच्या सपाटीकरणाकरीता वापरली जाईल किंवा ती अशा भूखंडाच्या विकासाच्या प्रक्रियेतील कोणत्याही कामासाठी वापरली जाईल. त्यावेळी अशा मातीवर स्वामीत्वधन आकारले जाणार नाही.<br>• त्याचप्रमाणे, मौजे-मनोरी, ता.बोरीवली येथील न.भू.क्र. 185 या सरकारी तलावाची मोजणी नगर भूमापन अधिकारी, बोरीवली यांचे कार्यालयामार्फत करण्यात आलेली असून सदर मोजणीवेळी आजुबाजूच्या स्थानिक लोकांची अतिक्रमणे सरकारी तलावामध्ये येत असल्याचे निदर्शनास आलेले आहे. याबाबत, अतिक्रमणधारकांना उप जिल्हाधिकारी (अति/निष्का), मालाड यांचे कार्यालयामार्फत महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, 1966 चे कलम 50 अंतर्गत नोटीसा देण्यात आलेल्या असून त्याबाबतची पुढील कार्यवाही उप जिल्हाधिकारी (अति/निष्का),मालाड यांचे कार्यालयामार्फत सुरु आहे. तसेच, मौजे-मनोरी, ता.बोरीवली येथील न.भू.क्र. 185 ही जागा पाणथळ मधून अधिसुचित नाही.</td>
<td rowspan="2">1.जिल्हाधिकारी मुंबई उपनगर<br>2. संचालक, पर्यावरण विभाग<br>3. आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका</td>
</tr>
<tr>
<td>3</td>
<td>श्री. हरिष पांडे<br>(WC-110)<br>Destruction of wetland & creek in Gorai Essel world area.<br>दि. 17.04.2023</td>
</tr>
</table>

| ठाणे जिल्हयातील कांदळवन तक्रारी | | | |
|---|---|---|---|
| 4 | **श्री. स्टॅलिन डी.** (**WC**- 81) Reclamation of Wetlands on the Left side of Kharigaon Toll Plaza as one drives from Thane to Kalyan. Date - 20.01.2020 | • **सदर तक्रारीबाबत ठाणे महानगरपालिकेने वन विभाग यांचे कार्यालयाशी संपर्क करुन भराव उचलण्याची तात्काळ कार्यवाही करावी तसेच खाजगी जागेच्या जमिनीवर कांदळवनाचे नुकसान केल्यामुळे संबंधितांना नुकसान भरपाईबाबत नोटिसा जारी कराव्यात व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल पुढील बैठकीपूर्वी समितीस सादर करण्याचे निर्देश मा.अध्यक्ष यांनी दिले होते.**<br>• त्यानुषंगाने, ठाणे महानगरपालिका, ठाणे यांच्या कार्यालयाचा दि. 09.11.2023 रोजीच्या प्राप्त अहवालात नमूद केले आहे की, तक्रार स्थळावरील एकूण बाधित जागेवरील डेब्रिज उचलण्याचा अंदाजखर्च तयार करण्यात आलेला असून रु.5,98,40,000/-(रुपये पाच कोटी अठ्ठयाण्णव लाख चाळीस हजार मात्र) इतक्या कामाचा अंदाजखर्च नमूद केला आहे. सदर प्रकरणी ठाणे महानगरपालिकेकडे अर्थसंकल्पीय तरतूद वरील कामासाठी उपलब्ध नसल्याने जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे सदर प्रस्ताव अर्थ सहाय्यसाठी सादर करण्यात येणार असून, तक्रारीच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीची माहिती मा.आयुक्त सो. यांना दि. 08.11.2023 रोजीच्या मान्यतेने सादर करण्यात येत आहे. | 1. जिल्हाधिकारी, ठाणे |
| 5 | **श्री. सुनील अगरवाल** (**WC**- 92) Mangrove and Wetlands destruction near Hiranandani Estate Thane. Date - 14.12.2019 (सदर तक्रार पाणथळ समितीकडे वर्ग झाली आहे) | • ठाणे महानगरपालिका यांचे कार्यालयाचा दि. 12 ऑगस्ट, 2023 रोजीच्या अहवालाचे अवलोकन केले असता, सदर जागा मौजे वडवली येथील स.नं. 100 या भूखंडाचे काही क्षेत्र नियोजित 40 मी. रुंद रस्त्याने बाधित होत असून, उर्वरित क्षेत्र हरित विभागात (मंजूर विकास नियंत्रण नियमावलीनुसार G-2 Zone) समाविष्ट आहे. तसेच हरित विभागातील काही भूखंडाच्या क्षेत्रावर नियोजित 30 मी. रुंद रस्त्या अंतर्गत मेट्रो कारशेड आरक्षण प्रस्तावित आहे. यामुळे स.न.100 या भूखंडाचे काही क्षेत्र बाधित होत असून उप विभागीय अधिकारी, खारभूमी विकास उप विभाग, भिवंडी (कळवा) ठाणे यांचे कार्यालयाकडील दिनांक 13.06.2012 रोजीच्या पत्रानूसार खारभूमी योजनेअंतर्गत पुनःप्रापित क्षेत्रातील भूखंडाचे यादीत मौजे वडवली येथील स.नं. 100 या भूखंडाचा समावेश आहे. तसेच, उपरोक्त भूखंडाचा वन विभागाचे यादीत समावेश नसून Eco Sensitive Zone, Metro Influence Zone व फ्लेमिंगोचे तरतुदीने सदर भूखंडाचे क्षेत्र बाधित नाही. त्याचप्रमाणे शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशास तसेच शासनाने मंजूर केलेल्या एकत्रीकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील (UDCPR - 2020) मा. | 1. जिल्हाधिकारी, ठाणे |

| | | | |
|---|---|---|---|
| | | आयुक्त सो. यांनी नियम क्र. 3.11 मधील तरतूदीनुसार मान्य केलेल्या फेरबदलास अधिन राहून विषयांकित भूखंडाबाबत अभिप्राय देण्यात येत आहे. असे अहवालात नमूद केलेले आहे.<br>• जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, ठाणे यांच्या दि.08.09.2023 रोजीच्या अहवालानूसार सदरची तक्रार ही ठाणे महानगरपालिका यांचे अखत्यारितील असून ठाणे महानगरपालिका यांनी तक्रारीतील नमूद क्षेत्र हे पाणथळ क्षेत्र नसल्याचे नमूद केले आहे.<br>• **या प्रकरणी निवासी उपजिल्हाधिकारी, ठाणे यांना सदर तक्रारीबाबतचे पूरक दस्तऐवज (Technical Support Document) जसे MRSAC नकाशांच्या प्रती किंवा वेटलँड ॲटलास नकाशे केलेल्या कार्यवाहीच्या अहवाल सोबत जोडून पुढील बैठकीपूर्वी समितीस सादर करण्याचे निर्देश मा.अध्यक्ष यांनी दिले होते.** | |
| 6 | 1) **श्री. सुनील अगरवाल.** (**WC- 96**)<br>Violation of CRZ rules & Indian Wildlife Protection Act in Sector 60, Nerul Navi, Mumbai. दि. 24.09.2022.<br>2) **श्रीमती कांचन पुरोहित** - Wetland of NRI, Sector 60, Nerul, Navi Mumbai, Water inlet blockage. दि. 06.11.2023. | • उपअधीक्षक, ट्रॉम्बे यांनी सदर जागा मीठागरे विभागाच्या अखत्यारीत नसून मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानूसार सदर जागा खाजगी व्यक्तीस सुपूर्द करण्यात आलेली असल्याचे सांगितले.<br>• **या प्रकरणी निवासी उपजिल्हाधिकारी, ठाणे यांना उपअधीक्षक ट्रॉम्बे, मीठागरे विभाग यांचेशी समन्वय साधून तक्रारीतील नमूद जागा सर्व्हे क्रमांकानूसार मीठागरे विभागाच्या अखत्यारीत येते अथवा नाही याची तपासणी करुन त्याबाबतचा लेखी अहवाल मीठागरे विभागाकडून प्राप्त करुन घ्यावा तसेच सदर जागा मीठागरे विभागाच्या अखत्यारीत नसल्यास तहसीलदार, ठाणे यांना सूचना (Guideline) देऊन समितीचे अशासकीय सदस्य श्री.स्टॅलीन डी. यांचे सोबत सदर बांध मोकळे करण्याचे आदेश द्यावेत असे निर्देश मा.अध्यक्ष यांनी निवासी उपजिल्हाधिकारी, ठाणे यांना दिले होते.**<br>• त्याअनुषंगाने उप आयुक्त, मीठागरे विभाग, मुंबई यांचे दि.10.10.2023 रोजीच्या पत्रान्वये या कार्यालयातील नोंदीनुसार, ठाणे खाडीजवळ (ठाणे शहरात) मीठ विभागाच्या मालकीची कोणतीही जमीन नाही. मीठ उपअधीक्षक, ट्रॉम्बे यांनी त्यांचे कार्यालयीन पत्र क्रमांक C.No.4/Salt/83/976 दिनांक 13.09.2023 अन्वये जिल्हाधिकारी, ठाणे यांना जेथे कांदळवनाचा नाश झाल्याची नोंद करण्यात आली आहे अशा जमिनींचा सर्व्हे नंबर देण्याबाबत विनंती केली आहे. परंतु जमिनीचा तपशील अद्यापही त्यांचे कार्यालयास अप्राप्त असल्याचे नमूद केले आहे. | 1. जिल्हाधिकारी, ठाणे<br>2. आयुक्त, मीठागरे विभाग<br>3. संचालक, पर्यावरण विभाग |

<table>
<tr><td>7</td><td>श्री. स्टॅलिन डी –<br>(WC- 102) Blockage of tide water by CIDCO in Survey Number 265 Nerul. दि. 08.10.2022.</td><td rowspan="2">• सिडको कार्यालयाच्या दि.17.07.2023 रोजीच्या अहवालानूसार, सदर जागेवर काही स्थानिक मच्छीमार समाजातील लोकांनी लाकडी झडपे लावून समुद्राच्या पाण्याची भरती व आहोटी दरम्यान संचालन करत असल्याचे निदर्शनास आले. यात त्यांचा मच्छीमारांचा हेतू असल्याचे आढळून येत असून या ठिकाणी सिडको ने भू-विकासाचे कुठलेही कार्य हाती घेण्यात आलेले नसल्याचे नमूद केले आहे.<br>• या तक्रारी संदर्भात सिडको यांच्या अहवालाच्या अनुषंगाने सहायक आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांना या तक्रारीबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल पुढील बैठकीपूर्वी सादर करण्याचे निर्देश मा.अध्यक्ष यांनी दिले होते.</td><td rowspan="2">1. नवी मुंबई महानगरपालिका</td></tr>
<tr><td>8</td><td>श्रीमती श्रुती अग्रवाल<br>दि. 28.02.2023 व<br>श्री. स्टॅलिन डी.<br>दि. 01.03.2023<br>(WC-105)<br>1. Blockage of water in the wetlands behind NRI complex.<br>श्री. प्रदीप पाटोले<br>दि.16.05.2023.<br>1. NRI complex Survey No.22 a huge Mangrove patch is in possession of CIDCO.</td></tr>
<tr><td>9</td><td>श्री.निशांत बांगेरा –<br>(WC - 104)<br>Reclamation of Railadevi Lake, Thane</td><td>• मा.अध्यक्ष यांनी मुख्य पर्यावरण अधिकारी, ठाणे महानगरपालिका यांना Standard Operating Procedure (SOP) तयार केल्याबाबत तसेच NGO व वन्यजीव तज्ञ यांचे सोबत कमिटी स्थापन केल्याबाबतचा अहवाल पुढील बैठकीपूर्वी समितीस सादर करण्याचे निर्देश मा.अध्यक्ष यांनी दिले होते. सोबत सार्वजनिक बांधकाम विभागाकडील अहवाल जोडून देण्यात यावा असे आदेश मा.अध्यक्ष यांनी दिले होते.<br>• त्याअनुषंगाने ठाणे महानगरपालिका, ठाणे यांचे दि.06.10.2023 रोजीच्या अहवालानुसार रायलादेवी तलावाचे पर्यावरणपूरक संवर्धन करणे तसेच त्या धर्तीवर इतर तलावांचे संवर्धन होण्याकरीता मा. आयुक्त सो. यांच्या 20.09.2023 रोजीच्या मान्यतेनुसार समिती स्थापन करण्यात आली आहे. सदर समितीस तलाव संवर्धनाच्या कामकाजाबाबत SOP (Standard operation procedure) तयार</td><td>1. ठाणे महानगरपालिका</td></tr>
</table>

| | | | |
|---|---|---|---|
| | | करण्याचे मा. अतिरिक्त आयुक्त, (2) सो. यांच्या दि.21.09.2023 रोजीच्या पत्रान्वये आदेश दिले आहेत. याबाबत, ठाणे महानगरपालिका यांच्या कार्यालयाचा दि. 08.11.2023 रोजीच्या पत्रान्वये अंतिम SOP समितीस प्राप्त झालेला आहे.<br>• विषयांकीत तक्रारीच्या अनुषंगाने रायलादेवी तलाव व परिसरात करण्यात येणाऱ्या कामांची माहिती एम.एम.आर.डी.ए. यांचेकडून मागविली असता, "पाणथळ भागात तसेच त्या भोवती असलेल्या गॅबियन वॉल (संरक्षक भिंत) या भागात कुठलेही काम करण्याचे नियोजन नसल्याबाबत" कार्यकारी अभियंता, एम.एम.आर.डी.ए. यांनी दि.25.09.2023 रोजीच्या पत्रान्वये अभिप्राय सादर केला असल्याचे नमूद केले आहे. | |
| 10 | **श्रीमती श्रुती अग्रवाल**<br>(WC-112)<br>Regarding Construction happening in sector 58 near NRI complex<br>**दि**.13.09.2023. | • या प्रकरणी मा.अध्यक्ष यांनी दिलेल्या निर्देशानूसार सदस्य सचिव तथा उप वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई यांचेमार्फत दिनांक 15.09.2023 रोजीच्या पत्रान्वये संबंधित अधिकारी यांचेकडून अहवाल मागविण्यात आला आहे. तथापि, अहवाल अप्राप्त आहे. | 1. आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका<br>2. सह-व्यवस्थापकीय संचालक, सिडको<br>3. जिल्हाधिकारी ठाणे |

| | | | |
|---|---|---|---|
| **रायगड जिल्हयातील कांदळवन तक्रारी** | | | |
| 11 | **श्री.स्टॅलिन डी.**<br>(**WC- 87**)<br>Destruction of coastal Wetlands in Kharghar Sector 16.<br>दि. 05.01.2021 | • सिडको विभागाच्या दि.08.03.2023 रोजीच्या संयुक्त स्थळ पहाणी दरम्यान सदर जाळया श्री. मुझाम्मिल पटेल व इतर यांच्या असल्याचे समजले असून, दि.23.03.2023 रोजीच्या नियंत्रक, अनाधिकृत बांधकामे यांच्या अहवालानूसार सदर जागेवरील जाळया काढण्यात आलेल्या असून सोबत सदर जागेचे छायाचित्रे जोडण्यात आले असल्याचे नमूद केले आहे.<br>• **सदर तक्रारीबाबत संयुक्त स्थळपाहणीकरीता तक्रारदार यांना बोलविण्यात आलेले नसल्याचे श्री. स्टॅलिन डी. यांनी चर्चे दरम्यान सांगितले. तथापि मा.अध्यक्ष यांनी तक्रारदार यांचेसोबत पुन:श्च स्थळपाहणी करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल पुढील बैठकीपूर्वी समितीस सादर करावा असे वरिष्ठ नियोजनकार (पर्यावरण), सिडको तसेच निवासी उपजिल्हाधिकारी, रायगड यांना दिले होते.** | 1. सह-व्यवस्थापकीय संचालक, सिडको<br>2. जिल्हाधिकारी रायगड |
| 12 | **श्री. स्टॅलिन डी –**<br>(**WC- 100**)<br>Wetlands already eliminated in defiance of court orders to protect and ones that are presently being destroyed.दि. 12.07.2022. | • निवासी उपजिल्हाधिकारी, रायगड यांनी रायगड जिल्ह्यातील सर्व तक्रारींकरीता संयुक्त स्थळपाहणी शुक्रवार, दि.15.09.2023 रोजी संचालक, पर्यावरण विभाग व सिडको यांचे प्रतिनिधीं सोबत ठेवण्यात आली असल्याचे नमूद करुन त्यापुढच्या आठवडयातील गुरुवार, दि.21.09.2023 रोजी जिल्हाधिकारी रायगड यांनी पाचही तक्रारींच्या स्थळपाहणी संदर्भात संयुक्त बैठक आयोजित करण्याचे निर्देश दिलेले असून तद्नंतर समितीकडे अहवाल सादर करण्यात येईल असे सांगितले.<br>• **त्याअनुषंगाने निवासी उपजिल्हाधिकारी, रायगड यांना पुढील बैठकीपूर्वी अहवाल सादर करण्याचे निर्देश मा.अध्यक्ष यांनी दिले होते.** | 1. जिल्हाधिकारी, रायगड<br>2. सह-व्यवस्थापकीय संचालक, सिडको<br>3. संचालक, पर्यावरण विभाग |
| 13 | **श्री. स्टॅलिन डी –**<br>(**WC- 101**)<br>Please Stop Reclamation and destruction of belpada Wetland.<br>दि. 28.09.2022 | • **सदर तक्रारीबाबत निवासी उपजिल्हाधिकारी, रायगड यांना पुढील बैठकीपूर्वी अहवाल सादर करण्याचे निर्देश मा.अध्यक्ष यांनी दिले होते.**<br>त्यानुषंगाने, जिल्हाधिकारी, रायगड यांचा कार्यालयाचा दिनांक 08 नोव्हेंबर, 2023 रोजीच्या प्राप्त अहवालात असे नमूद केले आहे की, मौजे जासई येथील स.नं. 41,48,47 मध्ये डेब्रीजचा भराव टाकण्यात आलेला असून सदर जागेत RMC Plant सुरु आहे. याबाबत लवकरच कारवाई करण्यात येईल असे सिडकोचे प्रतिनिधी श्री.जगदीश पाटील यांनी सांगितले तसेच, श्री अनिरुध्द महादेव ठाकूर व इतर यांनी स.नं. 41/6 मध्ये 18 वर्षापूर्वी मातीचा भराव केलेला असून सदर जागा ही खाजगी व्यक्तीच्या नावे आहे आणि सदरची जमिन अधिसूचित पाणथळ नसून –हास झाली आहे असे म्हणता येणार नाही. | 1. जिल्हाधिकारी, रायगड |

| | | | |
|---|---|---|---|
| 14 | **श्री. बी.एन.कुमार –**<br>**(WC - 103)**<br>10 acres of Kharghar wetland systematically buried<br>**दि**. 04.01.2023. | • निवासी उपजिल्हाधिकारी, रायगड यांनी रायगड जिल्ह्यातील सर्व तक्रारींकरीता संयुक्त स्थळपाहणी शुक्रवार, दि.15.09.2023 रोजी संचालक, पर्यावरण विभाग व सिडको यांचे प्रतिनिधीं सोबत ठेवण्यात आली असल्याचे नमूद करुन त्यापुढच्या आठवडयातील गुरुवार, दि.21.09.2023 रोजी जिल्हाधिकारी रायगड यांनी पाचही तक्रारींच्या स्थळपाहणी संदर्भात संयुक्त बैठक आयोजित करण्याचे निर्देश दिलेले असून तद्नंतर समितीकडे अहवाल सादर करण्यात येईल असे सांगितले.<br>• **त्याअनुषंगाने निवासी उपजिल्हाधिकारी, रायगड यांना पुढील बैठकीपूर्वी अहवाल सादर करण्याचे निर्देश मा.अध्यक्ष यांनी दिले होते.** | 1. जिल्हाधिकारी, रायगड<br>2. सह-व्यवस्थापकीय संचालक, सिडको<br>3. संचालक, पर्यावरण विभाग |
| 15 | **श्री.बी.एन.कुमार**<br>**(WC-106)**<br>NMSEZ IT Hub on Mangrove-wetland graves-Request to stop it.<br>दि. 08.03.2023 | • निवासी उपजिल्हाधिकारी, रायगड यांनी रायगड जिल्ह्यातील सर्व तक्रारींकरीता संयुक्त स्थळपाहणी शुक्रवार, दि.15.09.2023 रोजीक्र संचालक, पर्यावरण विभाग व सिडको यांचे प्रतिनिधीं सोबत ठेवण्यात आली असल्याचे नमूद करुन त्यापुढच्या आठवडयातील गुरुवार, दि.21.09.2023 रोजी जिल्हाधिकारी रायगड यांनी पाचही तक्रारींच्या स्थळपाहणी संदर्भात संयुक्त बैठक आयोजित करण्याचे निर्देश दिलेले असून तद्नंतर समितीकडे अहवाल सादर करण्यात येईल असे सांगितले.<br>• **त्याअनुषंगाने निवासी उपजिल्हाधिकारी, रायगड यांना पुढील बैठकीपूर्वी अहवाल सादर करण्याचे निर्देश मा.अध्यक्ष यांनी दिले होते.** | 1. जिल्हाधिकारी, रायगड<br>2. सह-व्यवस्थापकीय संचालक, सिडको<br>3. संचालक, पर्यावरण विभाग |
| 16 | **श्री. बी.एन.कुमार**<br>(WC-111)<br>Reclamation of Dastan, Savarkhar intertidal waters complete.<br>दि. 23.04.2023 | • जिल्हाधिकारी रायगड यांचे दि.14.07.2023 रोजीच्या अहवालानूसार, तक्रारीत नमूद दोन्हीही जागा जे.एन.पी.टी. यांच्या मालकीच्या असून सदर जागेवर जे.एन.पी.टी. मार्फत विकास कामांकरीता वापर सुरु असल्याचे नमूद केले आहे.<br>• निवासी उपजिल्हाधिकारी, रायगड यांनी रायगड जिल्ह्यातील सर्व तक्रारींकरीता संयुक्त स्थळपाहणी शुक्रवार, दि.15.09.2023 रोजी संचालक, पर्यावरण विभाग व सिडको यांचे प्रतिनिधीं सोबत ठेवण्यात आली असल्याचे नमूद करुन त्यापुढच्या आठवडयातील गुरुवार, दि.21.09.2023 रोजी जिल्हाधिकारी रायगड यांनी पाचही तक्रारींच्या स्थळपाहणी संदर्भात संयुक्त बैठक आयोजित करण्याचे निर्देश दिलेले असून तद्नंतर समितीकडे अहवाल सादर करण्यात येईल असे सांगितले.<br>• **त्याअनुषंगाने निवासी उपजिल्हाधिकारी, रायगड यांना पुढील बैठकीपूर्वी अहवाल सादर करण्याचे निर्देश मा.अध्यक्ष यांनी दिले होते.**<br>• त्यानुसार, जिल्हाधिकारी, रायगड यांचा कार्यालयाचा दि. 08.11.2023 रोजीच्या प्राप्त अहवालात नमूद केले आहे की, सदर जागा पाणथळ असल्याबाबत बोध होत नाही. तसेच उपरोक्त जागा पाणथळ असल्याबाबत कोणतीही बाब निर्दशनास न आल्याने सदर तक्रारी बाबत समितीने पुढील निर्णय घ्यावा असे नमूद केलेले आहे. | 1. जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्ट<br>2. जिल्हाधिकारी, रायगड<br>3. सह-व्यवस्थापकीय संचालक, सिडको<br>4. संचालक, पर्यावरण विभाग |

| पालघर जिल्हयातील कांदळवन तक्रारी | | | |
|---|---|---|---|
| 17 | **श्री. दामोदर शिंगडा** (**WC**-86) वसई तालुक्यातील मौजे धोवली येथे पाणथळ क्षेत्रातील समुद्राला लागून असलेल्या सर्वे नं. १०९ ते सर्वे नं.११५ मधील ५० एकर पेक्षा जास्त पाणथळ जागेतील तिवरे / कांदळवन कापून बेकायदा भराव केल्याबाबत. दि. 26.12.2022 | • वसई विरार शहर महानगरपालिका यांचे दि.13.07.2023 रोजीच्या अहवालानूसार गाव-मौजे धोवली, स.नं.109 ते 115 या जमिनीवर दि.17.12.2020 रोजी तालुका स्तरीय कांदळवन समिती यांनी प्रत्यक्ष पाहणी केली असता सदर ठिकाणी कांदळवनाचे नुकसान झाल्याचे दिसून आलेले नाही. तसेच माहे जानेवारी 2013 मध्ये उक्त स.नं.109 या जमिनीवर भराव होऊन कांदळवनाचे नुकसान झाल्या प्रकरणी वसई पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजी नंबर-02/2013 दि.12.01.2013 अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असल्याचे नमूद केले आहे.<br>• सदर तक्रारीच्या चर्चे दरम्यान निवासी उपजिल्हाधिकारी, पालघर यांनी स्थळपाहणीचे नियोजन करण्यात आले असल्याचे सांगितले असून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस पाठविण्यात येईल असे सांगितले.<br>• **त्याअनुषंगाने निवासी उपजिल्हाधिकारी, पालघर यांना पुढील बैठकीपूर्वी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस सादर करण्याचे निर्देश मा.अध्यक्ष यांनी दिले होते.** | 1. जिल्हाधिकारी पालघर |
| 18 | **श्री. निलेश विनायक जोशी** (**WC**- 95) पालघर जिल्हयातील वसई तालुक्यातील, वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती एच येथील दिवाणमान परिसरातील CRZ Area - No Development Zone मधील बांधकाम अनधिकृत यादीत नसल्याबाबतची तक्रार. दि. 21.12.2021 | • सदर तक्रारीच्या चर्चे दरम्यान निवासी उपजिल्हाधिकारी, पालघर यांनी स्थळपाहणीचे नियोजन करण्यात आले असल्याचे सांगितले असून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस पाठविण्यात येईल असे सांगितले.<br>• **त्याअनुषंगाने निवासी उपजिल्हाधिकारी, पालघर यांना पुढील बैठकीपूर्वी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस सादर करण्याचे निर्देश मा.अध्यक्ष यांनी दिले होते.** | 1. संचालक, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई<br>2. जिल्हाधिकारी पालघर |
| 19 | **श्री.दिपक बारीया** (**WC**-107) तत्कालीन वसई तहसिलदार | • जिल्हाधिकारी पालघर यांचे दि.28.07.2023 रोजीच्या अहवालानूसार, सदर तक्रारी संदर्भात दिनांक 04.07.2023 रोजी स्थळ पहाणी करण्यात आलेली आहे. सदर ठिकाणी पाणथळाचा तसेच कांदळवनाचे ऱ्हास / नुकसान झालेले नसून कोणत्याही प्रकारचा भराव केल्याचे दिसून आलेले नसल्याचे नमूद केले आहे. | 1. जिल्हाधिकारी पालघर |

| | | | |
|---|---|---|---|
| | यांनी "पाणथळ तक्रार निवारण समिती" यांना सादर केलेले खोटे अहवाल व आरोपीत इसमासोबत स्वत:च्या आर्थिक फायद्यासाठी संगनमत करुन शासकीय कर्तव्य बजावण्यात केलेला कसूर ह्या बाबत. दि. 26.03.2023 | • **त्याअनुषंगाने निवासी उपजिल्हाधिकारी, पालघर यांना सदर तक्रारीबाबतचे पूरक दस्तऐवज (Technical Support Document) जसे MRSAC नकाशे किंवा वेटलँड ॲटलास नकाशांच्या प्रती केलेल्या कार्यवाहीच्या अहवाल सोबत जोडून पुढील बैठकीपूर्वी समितीस सादर करण्याचे निर्देश मा.अध्यक्ष यांनी दिले होते.** | |
| 20 | **श्री.फ्रान्सिस डिसोजा (WC-108)** भुईगाव खुर्द व बुद्रुक हद्दीतील सरकारी मालकीच्या सर्व्हे नं.164 या पाणथळ खार जमिनीवर बेकायदा भराव व बेकायदा रस्त्याचे बांधकाम करीत असलेल्या गुन्हेगारांवर गुन्हा दाखल करुन कारवाई करणेबाबत. दि. 31.03.2023 | • सदर तक्रारीच्या चर्चे दरम्यान निवासी उपजिल्हाधिकारी, पालघर यांनी स्थळपाहणीचे नियोजन करण्यात आले असल्याचे सांगितले असून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस पाठविण्यात येईल असे सांगितले.<br>• **त्याअनुषंगाने निवासी उपजिल्हाधिकारी, पालघर यांना पुढील बैठकीपूर्वी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस सादर करण्याचे निर्देश मा.अध्यक्ष यांनी दिले होते.** | 1.जिल्हाधिकारी पालघर |
| 113 | **श्री.मॅकेन्झी डाबरे (WC-113)** पाणथळ तक्रार निवारण समितीच्या जिल्हास्तरीय, तालुकास्तरीय अधिका-यांच्या कर्तव्यपूर्तीचे मूल्यमापन होणेबाबत तसेच पाणथळ क्षेत्र संरक्षणात कसुरी करणारे प्रांताधिकारी आणि जिल्हाधिकारी यांच्याविरोधात | **या प्रकरणी मा.अध्यक्ष यांनी दिलेल्या निर्देशानूसार सदस्य सचिव तथा उप वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई यांचेमार्फत दिनांक 08.11.2023 रोजीच्या पत्रान्वये कार्यवाही अहवाल संबंधित यंत्रणेकडून मागविण्यात आला होता. तथापी, अहवाल अप्राप्त आहे.** | 1. वसई विरार शहर महानगरपालिका<br>2. जिल्हाधिकारी, पालघर |

| | | | |
|---|---|---|---|
| | शिस्तभंगाची कारवाई होणेबाबत.<br>**दि.** 16.10.2023 | | |
| 114 | **श्री. अनिकेत सतीस वाडीलकर**<br>**(WC-114)**<br><br>मौजे आगाशी येथील सर्वे क्रमांक 233/1 अ या पाणथळ जागेत झालेला मातीचा भराव हटवण्याबाबत व तिवरांच्या झाडांची पुन्हा लागवड करण्याबाबत.<br>**दि.** 03.11.2023 | **या प्रकरणी मा.अध्यक्ष यांनी दिलेल्या निर्देशानूसार सदस्य सचिव तथा उप वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई यांचेमार्फत दिनांक 08.11.2023 रोजीच्या पत्रान्वये कार्यवाही अहवाल संबंधित यंत्रणेकडून मागविण्यात आला होता. तथापी, अहवाल अप्राप्त आहे.** | 1. वसई विरार शहर महानगरपालिका<br>2. जिल्हाधिकारी, पालघर<br>3. उपवनसंरक्षक, डहाणू वन विभाग, डहाणू |